E/GB/Council agenda

<u>वाचा-</u>

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 5 पोटकलम 2(ब)
6) महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012
7) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 20,25,30 व 31-अ
8) महा.महानगरपालिका अधि.अनुसुची 'ड' चे प्रकरण 2 मधील नियम क्र.1(क),(ह),(आय)

जा.क्र./लाशमनपा/नसवि/-02-/2026
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
(महापालिका सचिव यांचे कार्यालय)
दिनांकः-02/03/2026

**प्रति,**

**श्री./श्रीमती** -------------------,

--------------------------------

सन्मा.सदस्य/सदस्या,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

यादवारे आपणास कळविण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक 10.03.2026 रोजी मंगळवार सकाळी ठिक 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. (सभेच्या कार्यपत्रिकेची सूचना सोबत जोडलेली आहे.)

तरी आपण सदरील विशेष सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**(मा.महापौर यांच्या आदेशान्वये/-)**

**महापालिका सचिव**

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

**<u>विषय क्र.3</u>** मागील सभा मा.महापौर व मा.उपमहापौर पदाच्या निवडणुकीची दि.09.02.2026 रोजीचे सभेचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत.

**<u>नेमणूका</u>**

**<u>विषय क्र.4</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 19-एक-अ अन्वये **सभागृहनेता** व 19-एक-अअ अन्वये विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता देण्यात आल्याचे मा.सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर.

**<u>विषय क्र.5</u>** महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 5(2) (ब) मध्ये असलेली तरतूद नुसार लातूर शहर महानगरपालिकेत 7(सात) नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाची अधिसूचना दि.28 फेब्रुवारी 2012 अनुसार याबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती ठरवून दिलेली आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

1) पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी गटनेत्याने त्यांच्या पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन उक्त अधिसूचनेतील नियम 4 अन्वये अर्हताधारक व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याबाबत मा.आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांचेकडे विचारविनिमय करून शिफारस करतील. तसेच नियम 5 नुसार नियम 4 मधील क ते छ मधील अर्हता असणा-या प्रत्येकी एका व्यक्तीची पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्य करण्यात यावा.
2) नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीकरीता गटनेता यांनी त्या-त्या पक्षाचे निर्वाचित सदस्याचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन मा.आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांचेकडे आपले प्रस्ताव व अर्ज विचारविनिमयास्तव सादर करावेत. अर्जाचे नमुने बुधवार दि.04.03.2026 पासून नगरसचिव यांचेकडे कार्यालयीन वेळेत उपलब्ध ठेवणेत येतील. अर्जासोबत ज्या व्यक्तीचे नामनिर्देशन करावयाचे आहे त्यांचा विहित नमुन्यातील अर्ज, अपत्यासंबंधीचे शपथपत्र, मालमत्ता व गुन्हेगारी संबंधीचे शपथपत्र व उमेदवाराचे घोषणापत्र, शौचालय प्रमाणपत्र, मालमत्ता बेबाकी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (दोन्हीही शपथपत्रे साध्या पेपरवर नोटरीकृत सादर करणे आवश्यक आहे.)
3) नामनिर्देशित करावयाचे व्यक्तीचे नाव लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 चे मतदार यादीमध्ये असणे बंधनकारक आहे.
4) आयुक्तांनी केलेल्या शिफारशींचा विचार करून महानगरपालिका, पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करील.

**<u>विषय क्र.6</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम 20 मधील तरतूदीप्रमाणे स्थायी समितीच्या 16(सोळा) सदस्यांची नेमणूक करणे.

**उक्त कलमानुसार महानगरपालिकेने पालिका सदस्यांपैकी 16 (सोळा) सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर नियुक्ती ही महाराष्ट्र**

महानगरपालिका अधिनियमातील कलम 31-अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून करण्यात येईल. प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या तौलनिक संख्याबळाप्रमाणे अनुज्ञेय संख्येच्या प्रमाणातच स्थायी समिती सदस्यांसाठी त्यांच्या पक्षाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

**विषय क्र.7** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम 25 मधील तरतूदीप्रमाणे परिवहन समितीच्या 12 (बारा) सदस्यांची नेमणूक करणे.

उक्त समितीतील सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी कलम 25(2) अन्वये अर्हताधारक व्यक्तीची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच सदर नियुक्ती ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 31-अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून करण्यात येईल. प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या तौलनिक संख्याबळाप्रमाणे अनुज्ञेय संख्येच्या प्रमाणातच परिवहन समिती सदस्यांसाठी व्यक्तींचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

**विषय क्र.8** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम 29-अ प्रमाणे प्रभाग समित्या गठीत करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.9** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम 30 मधील तरतूदीप्रमाणे महिला व बालकल्याण विशेष समितीची सदस्य संख्या निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.10** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील कलम 30 मधील तरतूदीप्रमाणे 1.आरोग्य, कामगार, समाजकल्याण व दिवाबत्ती समिती, 2. शिक्षण, विद्यार्थी व युवक कल्याण, सांस्कृतिक कार्य, नाव समिती 3. पाणी पुरवठा, स्वच्छता, मलःनिस्सारण, पर्यावरण, शहर सुशोभीकरण समिती, 4.उद्यान, बाजार, क्रिडा, विधी या विशेष समित्या स्थापित करणे व या विशेष समित्यांची सदस्य संख्या व कार्यक्षेत्र निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.11** प्रशासकीय कालावधीतील सन 2025-26 मधील जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर कामांचा सविस्तर आढावाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.12**. लातूर शहरात स्वर्गीय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांचे स्मारक उभारणीबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.13**. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा 75 फुट उंचीचा पुतळा उभारणी कामाचा आढावा घेवून निर्णय घेणे.

**विषय क्र.14**. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क पुर्नविकास बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.15**. लातूर शहर महानगरपालिकेच्या बस सेवेच्या आढावा बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.16**. वाहतूक व्यवस्थापन- सर्वकष आढावा घेवून पार्कींग करिता विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.17**. होर्डींग व युनिपोल धोरणाचा आढावा घेवून त्याबाबत नियमावली आणि धोरण निश्चित करणे. अनाधिकृत होर्डिंग बॅनर बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.18**. नाना-नानी पार्क सद्य:स्थितीवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

महापालिका सचिव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर